महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक:डीआरए-०५२१/प्र.क्र.१९६/२०२३/जाहिरात दिनांक: ०९ नोव्हेंबर, २०२३

**-: शुध्दीपत्रक :-**

**विषय : विविध विषयांतील प्राध्यापक / सहयोगी प्राध्यापक / सहायक प्राध्यापक, ग्रंथपाल, शारिरीक शिक्षण निर्देशक, महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट-अ / अधिव्याख्याता, महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट-ब**

**संदर्भ : जाहिरात क्रमांक - ११२/२०२३, ११३/२०२३, ११४/२०२३ आणि ११५/२०२३**

शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागातील मागणीपत्रानुसार आयोगामार्फत विविध विषयांतील प्राध्यापक / सहयोगी प्राध्यापक / सहायक प्राध्यापक/ग्रंथपाल/शारिरीक शिक्षण निर्देशक, महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट-अ / अधिव्याख्याता, महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट-ब (जा.क्र.११२/२०२३ ते ११५/२०२३) या संवर्गांच्या जाहिराती प्रसिध्द करण्यात आल्या असून अर्ज करण्याचा अंतिम दिनांक ०९ नोव्हेंबर, २०२३ असा आहे. तथापि, जाहिरात क्रमांक ११२/२०२३, ११३/२०२३ व ११४/२०२३ प्रकरणी समतुल्य अर्हताधारक उमेदवारांमध्ये अर्ज सादर करण्यामध्ये संदिग्धता निर्माण झाल्यामुळे बऱ्याच उमेदवारांकडून दूरध्वनीद्वारे/ईमेलद्वारे/अभिवेदने आयोगाकडे प्राप्त झालेली आहेत.

**२.** उमेदवार सदर सर्व जाहिरातींमध्ये नमूद केलेल्या विषयाच्या समतुल्य शैक्षणिक अर्हता धारण करीत असल्यास त्यांच्या समतुल्य अर्हतेबाबत भरती प्रक्रीयेच्या पुढील टप्प्यावर तपासणी करण्याच्या अधीन राहून संबंधित उमेदवारांकडून अर्ज स्वीकारण्यात येत आहे. त्याकरीता संबंधित समतुल्य अर्हताधारक उमेदवारांनी अर्ज सादर करताना Equivalent to (relevant subject) अशी अर्हता नमूद करुन अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

**३.** जाहिरात क्रमांक ११२/२०२३, ११३/२०२३, ११४/२०२३ प्रकरणी वरीलप्रमाणे समतुल्य शैक्षणिक अर्हता धारक उमेदवारांना अर्ज सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. तसेच जाहिरात क्रमांक ११५/२०२३ प्रकरणी प्रशासकीय कारणास्तव अर्ज सादर करण्यास मुदतवाढ देण्यात येत आहे. संबंधित जाहिरातींना अनुसरुन प्रस्तुत शुध्दीपत्रकान्वये अर्ज सादर करण्याच्या प्रक्रियेस, खालीलप्रमाणे मुदतवाढ देण्यात येत आहे:-

| अ.क्र. | तपशील | विहित कालावधी |
|---|---|---|
| १ | **अर्ज सादर करावयाचा अंतिम कालावधी** | **दिनांक १७ नोव्हेंबर, २०२३ रोजी २३.५९** |
| २ | **ऑनलाईन पध्दतीने विहित परीक्षा शुल्क भरण्याकरीता अंतिम दिनांक** | **दिनांक १७ नोव्हेंबर, २०२३ रोजी २३.५९** |
| ३ | **भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरण्यासाठी चलनाची प्रत घेण्याचा दिनांक** | **दिनांक १९ नोव्हेंबर, २०२३ रोजी २३.५९** |
| ४ | **चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरण्याचा अंतिम दिनांक** | **दिनांक २० नोव्हेंबर, २०२३ रोजी बँकेच्या कार्यालयीन वेळेमध्ये** |

**४.** प्रस्तुत जाहिरातीस अनुसरुन विहित पध्दतीने यापूर्वी अर्ज सादर केलेल्या उमेदवारांना पुन्हा अर्ज करण्याची आवश्यकता नाही.

**५.** वयोमर्यादा तसेच शैक्षणिक अर्हता आणि अनुभवाचा कालावधी मूळ जाहिरातीमध्ये नमूद दिनांकानुसारच म्हणजेच दिनांक ०९ नोव्हेंबर, २०२३ पर्यन्त गणण्यात येईल.

**६.** जाहिरातींमधील इतर अटी व तरतुदींमध्ये कोणताही बदल नाही.

**७.** सदर शुध्दीपत्रक तसेच मूळ जाहिरात क्रमांक ११२/२०२३, ११३/२०२३, ११४/२०२३ आणि ११५/२०२३ आयोगाच्या https://mpsc.gov.in तसेच https://mpsconline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

उप सचिव, जाहिरात
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

ठिकाण : नवी मुंबई.

(१) आयोगाच्या कार्यालयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात, तसेच, शारीरिक चाचणी व मुलाखतीच्या वेळी मोबाईल फोन, अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधने आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे.
(२) प्रमाणपत्र तपासणीच्या वेळी पात्रतेसंदर्भातील सर्व मूळ प्रमाणपत्रे सादर न केल्यास शिफारस/नियुक्तीसाठी विचार करण्यात येणार नाही.